# कार्यालय मध्यवर्ती संशोधन केंद्र
## डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

दूरध्वनी क्र.: ०७२४-२२५८११३ ई-मेल: directorcrs78@gmail.com


जा.क्र. म.सं.के./तांत्रिक/ १८३८ /२०२३ दि. २७/०३/२०२३

## निविदा सूचना

**विषय:- सन २०२३-२४ मध्ये मध्यवर्ती संशोधन केंद्र, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला अंतर्गत प्रक्षेत्रावरील बिजोत्पादन कार्यक्रम व फळबाग संबंधित <u>यांत्रिक कामे</u> कंत्राट पद्धतीने करण्याकरिता निविदा दर (कोटेशन) बोलविणेबाबत.....**

**संदर्भ:** कुलसचिव कार्यालय जा.क्र.बीईए/आस्था/कंत्राटी/कर्म/२०२१/५९४/ दि. २२ जून, २०२१.

वरील विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते कि, मध्यवर्ती संशोधन केंद्र, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला अंतर्गत विविध विभागाचे प्रक्षेत्रावरील बिजोत्पादन कार्यक्रम व फळबाग संबंधित यांत्रिक कामे कंत्राट पद्धतीने करण्याकरिता निविदा दर खालील प्रमाणे अटी व शर्तीस अधीन राहून मागविण्यात येत असून निविदा मसुदा/निविदेचे स्वरूप सोबत जोडण्यात आलेले आहे.

**अटी व शर्ती**

१. निविदा पत्रक कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी १०.०० ते दुपारी ५.३० या वेळेत स्वीकारल्या जातील.
२. निविदा पत्रक संचालक, मध्यवर्ती संशोधन केंद्र, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला यांचे नावाने सीलबंद लिफाफामधे पाठवावी.
३. निविदाधारक/कंत्राटदाराकडे संबंधित कामाचा वैध परवाना असणे बंधनकारक आहे. निविदाधारक/कंत्राटदाराला परवाना व संबंधित इतर सर्व आवश्यक कागदपत्रे या कार्यालयास सादर करणे बंधनकारक राहील.
४. निविदाधारक/कंत्राटदारास मिळालेल्या कामाच्या देयकाचे १० टक्के रक्कम सुरक्षा ठेव (Security Deposit) म्हणून संबंधित विभागाकडे जमा करावी लागेल व काम पूर्ण झाल्यावर सुरक्षा ठेव परत मिळण्याकरिता संबंधित विभागाचे प्रभारी अधिकारी यांचे कडे अर्ज करावा लागेल त्यानंतर सुरक्षा ठेव परत करण्यात येईल.
५. मध्यवर्ती संशोधन केंद्र कार्यालय अंतर्गत संपूर्ण विभागाचे प्रक्षेत्रावरील बिजोत्पादन कार्यक्रम व फळबाग संबंधित यांत्रिक कामे करीत असतांना पिकाचे/फळबागेचे नुकसान झाल्यास विद्यापीठ प्रशासनाने ठरवून दिलेल्या निकषाप्रमाणे नुकसान भरपाई संबंधित निविदाधारक/कंत्राटदाराकडून वसूल करण्यात येईल.
६. प्रक्षेत्रावरील विभागांवर बिजोत्पादन कार्यक्रम व फळबाग संबंधित यांत्रिक कामे करतेवेळी कुठलीही दुर्घटना/अपघात/जीवितहानी झाल्यास हे कार्यालय किंवा कोणताही कर्मचारी/अधिकारी किंवा विद्यापीठ जवाबदार राहणार नाही. याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित निविदाधारक/कंत्राटदाराची राहील.
७. विभागावर देण्यात आलेले बिजोत्पादन कार्यक्रम व फळबाग संबंधित यांत्रिक काम पूर्ण करण्यात यावे, कामाबाबत विभागावरून तक्रार आल्यास किंवा काम अर्धवट राहील्यास सदर कामाचे देयक काढण्यात येणार नाही.
८. विद्यापीठ प्रशासनाने वेळोवेळी निर्देशित केलेल्या नियमांचे पालन करणे संबंधित निविदाधारक/कंत्राटदारांना बंधनकारक राहील.
९. निविदाधारक/कंत्राटदारांनी देयक सादर करतेवेळी बँक खाते बाबतची संपूर्ण माहिती सादर करावी, अन्यथा देयक अदा केले जाणार नाही.

१०. या कार्यालयातर्फे निविदाधारक/कंत्राटदारास बिजोत्पादन कार्यक्रम व फळबाग संबंधित यांत्रिक कामे करण्याकरिता आवश्यक यंत्रे, शेती अवजारे व इंधन विद्यापीठातर्फे पुरविण्यात येईल. बिजोत्पादन कार्यक्रम व फळबाग संबंधित यांत्रिक कामे करण्याकरिता आवश्यक यंत्रे, शेती अवजारे व इंधन उपलब्ध करून देण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित विभागाचे प्रभारी अधिकारी यांची राहील.

११. निविदाधारक/कंत्राटदारास बिजोत्पादन कार्यक्रम व फळबाग संबंधित यांत्रिक कामाचे देयक काम पूर्ण व विहित वेळेत पूर्ण केल्यावर तसेच संबंधित विभागाचे प्रभारी अधिकारी यांनी काम समाधानकारक झाल्याचे प्रमाणित केल्यानंतरच कामाचे देयक पारित करण्यात येईल.

१२. प्रक्षेत्रावरील विभागांवर बिजोत्पादन कार्यक्रम व फळबाग संबंधित यांत्रिक कामे करीत असतांना कोणताही वाद विवाद निर्माण झाल्यास सदर वाद विवाद विद्यापीठ विधी विभागाचे अधिकारी/ मा. संशोधन संचालक, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला यांचे समक्ष मिटविला जाईल व अंतिम निर्णय मा. संशोधन संचालक, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला यांचा राहील आणि तो सर्वांना मान्य करणे बंधनकारक राहील.

१३. प्रक्षेत्रावरील विभागांवर बिजोत्पादन कार्यक्रम व फळबाग संबंधित यांत्रिक कामे हि एक वर्षामधील खरीप, रब्बी व उन्हाळी या **तिन्ही हंगामाकरिता असून कामाचे दर एक वर्षा करिता वैध राहतील.**

१४. सर्व अटी व शर्ती मान्य असल्याचे व संपूर्ण जबाबदारी निविदाधारक/कंत्राटदाराची असल्याचे रु. १०० चे स्टँप पेपर वर करारनामा सादर करणे संबंधित निविदाधारक/कंत्राटदारास बंधनकारक राहील.

१५. वरीलप्रमाणे अटी व शर्तीस अधीन राहून सोबत जोडलेल्या निविदा मसुदा तपशिला नुसार दि. **११.०४.२०२३** रोजी पर्यंत कार्यालयीन वेळेत निविदा सीलबंद लीफाफामध्ये सादर करावी.

संचालक
मध्यवर्ती संशोधन केंद्र
डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला

# निविदा (कोटेशन) मसुदा

मध्यवर्ती संशोधन केंद्र, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला अंतर्गत विविध विभागाचे प्रक्षेत्रावरील बिजोत्पादन कार्यक्रम व फळबाग संबंधित यांत्रिक कामे कंत्राट पद्धतीने करण्याकरिता दर खालील प्रमाणे आहेत.

<table>
<tr><th>अ.क्र.</th><th colspan="2">कामाचा तपशील</th><th>दर (रु.)</th><th>शेरा</th></tr>
<tr><td>१</td><td colspan="2">नांगरणी (एक फाळ, दोन फाळ, तीन फाळ)</td><td>प्रति हे.</td><td rowspan="10">प्रक्षेत्रावरील पिके -<br>सोयाबीन, कपाशी, मुंग, उडीद, ज्वारी, बाजरी, तूर, बोरू, ढेंचा, करडी, हरभरा, गहू, जवस, मोहरी, एरंडी, सुर्यफुल, तीळ, कराळ व इतर पिके<br><br>प्रक्षेत्रावरील फळबाग -<br>सिताफळ, चिकू, आंबा, निंबू, जांभूळ, पेरू, चिंच, आवळा व इतर फळबाग<br><br>टीप: यंत्रे, शेती अवजारे व इंधन विद्यापीठातर्फे पुरविण्यात येतील</td></tr>
<tr><td>२</td><td colspan="2">मोंगडणी (फंटावाही/पंजी)</td><td>प्रति हे.</td></tr>
<tr><td>३</td><td colspan="2">वखरणी (पट्टीपास/जांभूळवाही)</td><td>प्रति हे.</td></tr>
<tr><td>४</td><td colspan="2">रोटावेटर</td><td>प्रति हे.</td></tr>
<tr><td>५</td><td colspan="2">पेरणी</td><td>प्रति हे.</td></tr>
<tr><td>६</td><td colspan="2">कोळपणी/डवरणी</td><td>प्रति हे.</td></tr>
<tr><td>७</td><td>तणनाशक/कीटकनाशक/ बुरशीनाशक फवारणी</td><td>बूम स्प्रे</td><td>प्रति हे.</td></tr>
<tr><td>८</td><td colspan="2">मळणी (थ्रेशर)</td><td>प्रति क्विं.</td></tr>
<tr><td>९</td><td colspan="2">शेणखत भरणे, उतरविणे व पसरविणे</td><td>प्रति ५ क्विं.</td></tr>
<tr><td></td><td colspan="2"></td><td></td></tr>
</table>

निविदा सुचनेमधील संपूर्ण अटी व शर्ती मला सर्वस्वी मान्य आहेत.

**ठिकाण:**

**दिनांक:**

**स्वाक्षरी**

नाव व संपूर्ण पत्ता